दैनिक
# श्रमिक लोकराज्य

संपादक
ज्ञानेश्वर बालाजीराव डोईजड
मो.7875782377

कार्यकारी संपादक
वैजनाथ द.स्वामी
मो.8329736330

नांदेड । दैनिक । वर्ष 6 । अंक 288 । रविवार, दि. 12 जुलै 2026 । RNI MAHMAR/2021/85782 । पाने 04 । किंमत 2 रुपये । ई-पेपर : www.shramiklokrajya.in

## गुरुद्वारा व दरबार मस्जिद परिसरात SIR विशेष शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

### मतदारांच्या शंकांचे निरसन; जनजागृतीसाठी सामाजिक व धार्मिक प्रतिनिधींना आवाहन





श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नांदेड, दि. 11 जुलै :-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तथा जिल्हा निवडणूक अधिकारी व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली 087 नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात 'विशेष सखोल पुनर्निरिक्षण' (Special Intensive Revision-SIR) कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शनिवारी (दि. 11 जुलै) गुरुद्वारा परिसर तसेच दरबार मस्जिद, सराफा गल्ली येथे विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरांना मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ आणि सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार संजय वारकड यांनी भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. त्यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व बीएलओ यांना आवश्यक सूचना देत शिबिरांच्या माध्यमातून अधिकाधिक पात्र मतदारांपर्यंत पोहोचण्याचे निर्देश दिले.

**यावेळी उपस्थितांना Enumeration Form वेळेत भरून देण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच मस्जिदीच्या माध्यमातून SIR कार्यक्रमाबाबत आवश्यक जनजागृती करण्यात येईल, असे आश्वासन इमाम साहेबांनी दिले. जिल्हा प्रशासनाने सर्व पात्र मतदारांनी SIR प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन आपले Enumeration Form वेळेत भरून द्यावेत तसेच परिसरातील इतर नागरिकांमध्येही याबाबत जनजागृती करावी, असे आवाहन केले आहे.**

गुरुद्वारा परिसरातील शिबिरात डॉ. सचिन खल्लाळ यांनी काही मतदारांचे Enumeration Form स्वतः बीएलओच्या ॲपद्वारे भरून घेतले. यावेळी उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांशी संवाद साधून त्यांनी SIR प्रक्रियेबाबत समाजामध्ये व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन केले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यानंतर दरबार मस्जिद, सराफा गल्ली येथे भेटीदरम्यान इमाम साहेब, मस्जिद प्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांशी बैठक घेण्यात आली. बैठकीत SIR प्रक्रियेसंदर्भातील विविध बाबींसह विशेषतः Anomaly विषयी मतदारांच्या मनात असलेल्या शंकांचे सविस्तर निरसन करण्यात आले. अनेक मतदारांना Anomaly संदर्भात संभ्रम असल्याचे निदर्शनास आल्याने त्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आणि सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यात आली.

## दैनिक श्रमिक लोकराज्यच्या वृत्ताची दखल; चोंडी–तडखेल रस्त्यावरील पडलेले झाड हटविले

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुखेड :** मुखेड तालुक्यातील चोंडी–तडखेल मार्गावर महिनाभरापासून बाभळीचे झाड रस्त्यावर पडून असल्याने



वाहनचालक व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः रात्रीच्या वेळी या झाडामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

या गंभीर समस्येकडे दैनिक श्रमिक लोकराज्यने वृत्ताच्या माध्यमातून लक्ष वेधले होते. या वृत्ताची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने कारवाई करत रस्त्यावर पडलेले झाड हटवून वाहतूक सुरळीत केली.

झाडामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असतानाही ते महिनाभर हटविण्यात आले नव्हते. त्यामुळे एखादा अपघात घडला असता तर त्याची जबाबदारी कोणाची, असा सवाल दैनिक श्रमिक लोकराज्यने उपस्थित केला होता. वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित विभागाने तातडीने हालचाल करून झाड रस्त्याच्या बाजूला केल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.


दैनिक श्रमिक लोकराज्य
संपादक : ज्ञानेश्वर डोईजड 9172490365

**चोंडी–तडखेल रस्त्यावर महिनाभरापासून बाभळीचे झाड पडून; सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष?**

**गंभीर दुर्घटना किंवा जीवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची ?**

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**मुखेड :** चोंडी ते तडखेल या महत्त्वाच्या मार्गावर गेल्या जवळपास एक महिन्यापासून बाभळीचे मोठे झाड रस्त्यावर पडून असल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. संबंधित विभागाकडून अद्याप झाड हटविण्याची कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

रस्त्यावर पडलेल्या झाडामुळे वाहनांची ये-जा धोकादायक बनली असून विशेषतः रात्रीच्या वेळी झाडाचा अंदाज न आल्याने अपघात होण्याच्या घटना घडत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. दुचाकीस्वार व चारचाकी वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.

एखादी गंभीर दुर्घटना किंवा जीवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे तातडीने लक्ष देऊन रस्त्यावर पडलेले झाड हटवावे व वाहतूक सुरळीत करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील ग्रामस्थ व वाहनधारकांकडून करण्यात येत आहे.

**परिसरातील ग्रामस्थ आणि प्रवाशांनी दैनिक श्रमिक लोकराज्यने लोकहिताचा प्रश्न प्रभावीपणे मांडल्याबद्दल तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्काळ कारवाई केल्याबद्दल आभार व्यक्त केले आहेत. स्थानिक नागरिकांनी भविष्यातही अशा धोकादायक बाबींवर संबंधित विभागांनी तातडीने कारवाई करून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.**






# संपादकीय

## ‘सतलज’चे सत्य!




वादग्रस्त कलम वापरून ‘ओटीटी’वरूनही चित्रपट काढून टाकणारे केंद्रीय माहिती व प्रसारण खाते आता, आंतरविभागीय चौकशी समिती नेमून कारणांची शोधाशोध करणार!

तथ्य निष्पक्ष असू शकते किंवा किमान तसा दावा करू शकते. तथ्यांवर आधारित असे जे काही असते ते अखेर काही तथ्यांची निवड करणारे- म्हणजे निवडकच असते. याला ‘कलात्मक सत्य’ म्हणता येईल एक वेळ; पण ते समजा एखादीच बाजू घेणारे असेल, तर ते कुणासाठी तरी गैरसोयीचे म्हणून दाखवायचेच नाही का? शिवाय, जे दाखवले आहे तेच सत्य, असा आग्रह ही निवड करणाऱ्यांनी तरी का धरायचा? घटिताकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा ज्याचे-त्याचे सत्य असते : श्रेष्ठ जपानी दिग्दर्शक अकिरा कुरोसावा ‘राशोमोन’ चित्रपटात मांडू पाहतात तसे. ‘राशोमोन’च्या प्रदर्शनानंतर ७६ वर्षांनीही हा ‘राशोमोन परिणाम’ चित्रपटकर्ते आणि त्याचे नियमन करू पाहणाऱ्या वर्तुळाला व्यापून उरलाच आहे. एखाद्या आत्मवर्णनपर चित्रपटातील (बायोपिक) तथ्यांमधून जे काही कलात्मक सत्य आपल्यासमोर येते त्याचाही त्रास व्हावा, इतका. बहुचर्चित ‘सतलज’ चित्रपटाचे रखडणे, मग गुपचूप ओटीटी मंचावर येऊन, तेथून जाताना आणि गेल्यानंतर गाजावाजा करत राहणे, यात हे वरील सगळे आहे. काहींनीच का कायम सहिष्णू राहायचे, असे तर्कट मांडून असहिष्णू होण्याची निमित्ते अलीकडे शोधाल तितकी सापडत जातात. त्यातून चित्रपट, मालिका वगैरे तर चर्चा घडविण्यासाठी मोठी व्यासपीठे. याचे ‘सतलज’ हे ताजे उदाहरण. त्याभोवतीची घुसळण ही फक्त त्याच्या आशय-विषयापुरती मर्यादित नाही. ती अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या आणि त्याच्या ‘वाजवी’ मर्यादेच्याही मुद्द्यांना स्पर्श करते. म्हणून, त्यावर भाष्य आवश्यक.

आधी या चित्रपटाबद्दल थोडे. त्याचा काळ १९९० च्या दशकातील. पंजाबमध्ये १९८४ मध्ये झालेले ऑपरेशन ‘ब्लू स्टार’, त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या, त्यानंतर झालेले शीखविरोधी दंगे आणि त्यातून पुन्हा फुटीरतावादी खलिस्तानी चळवळीला मिळालेले बळ हा इतिहास नाकारता न येणारा. या फुटीरतावादाचा बीमोड करायला साधारण एक दशक लागले. तो करणारे पोलीस अधिकारी केपीएस गिल यांच्या कामगिरीची तारीफही केली गेली. मात्र, अतिरेक्यांचे दमन करताना अनेक निरपराधही त्यात भरडले गेले, असा आरोपही होत राहिला. ‘सतलज’ याच मुद्द्याला हात लागतो. या काळात निरपराध नागरिकांना उचलून पोलिसांकडून त्यांचे शिरकाण केले गेले, असे तो मांडतो.

नव्वदच्या दशकात नागरिकांच्या या गायब होण्याचे गूढ उकलण्यासाठी जसवंतसिंग खालरा हा बँक अधिकारी पुढे आला. त्यांना अमृतसरमधील काही स्मशानांतून बेवारस म्हणून नोंद झालेल्या मृतदेहांच्या याद्या मिळाल्या. याद्यांमध्ये मृताचा नाव-पत्ता असेल तर मृतदेह बेवारस कसा, या प्रश्नातून त्यांचा शोध व्यापक झाला. पूर्ण पंजाब राज्यात असे सुमारे २५ हजार मृतदेह बेवारस दाखवल्याचा दावा जसवंतसिंग यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर केला. पुढे मात्र ते स्वत:च गायब झाले. या प्रकरणाचा खटला चालला आणि जसवंतसिंग यांना ताब्यात घेऊन मारल्याबद्दल दोषी पोलीस अधिकाऱ्यांना काही वर्षांनंतर शिक्षाही सुनावली गेली. विषयच इतका संवेदनशील असल्याने तो प्रदर्शित होण्यात अडथळे आले. नावापासून दृश्यांवरील आक्षेपांपर्यंतची भरच पडत गेली. म्हणजे, २०२२ मध्ये हा चित्रपट तयार होऊन केंद्रीय चित्रपट प्रमाणीकरण मंडळाकडे (सीबीएफसी) अर्थात सेन्सॉर बोर्डाकडे गेला, तेव्हा आधी २१ दृश्यांना कात्री लावावी लागेल, अशी सूचना आली. ज्यात हळूहळू वाढ होत जाऊन संख्या १२७ वर गेली. दिग्दर्शक हनी त्रेहान यांनी या सूचनांमुळे ‘पंजाब ९५’ हे नाव बदलून ‘सतलज’ केले आणि काही दृश्यांना कात्री लावण्याची तयारीही दाखवली, पण १२७ दृश्ये कापल्यावर चित्रपटात उरणार तरी काय, असा प्रश्न पडला. याविरोधात मग निर्माते मुंबई उच्च न्यायालयात गेले, पण तेथून ते स्वत:च बाहेर पडले. काही खासगी खेळांखेरीज चित्रपटगृहांत हा चित्रपट आलाच नाही. गेल्या शुक्रवारी मात्र तो अचानकच ‘झी फाइव्ह’ या ओटीटी मंचावर कोणत्याही दृश्यकपातीविना प्रदर्शित झाला. ओटीटी मंचावरील प्रदर्शनासाठी ‘सीबीएफसी’चे प्रमाणपत्र लागत नाही, हा त्यातील तांत्रिक मुद्दा. मात्र ‘समाजमाध्यम-विरोधी कायदा’ म्हणून वादग्रस्त ठरलेल्या ‘माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २०२१’चे कलम ६९ हे ‘ओटीटी’वर प्रदर्शित होणाऱ्या कलाकृतींनाही लागू पडते, याचा आधार घेऊन दोनच दिवसांत तो ‘राष्ट्रीय सुरक्षे’च्या कारणास्तव ‘झी फाइव्ह’वरून काढला गेला. केंद्रीय माहिती आणि प्रसारण खात्याने आता आंतरविभागीय चौकशी समिती नेमून चित्रपटातील आशय तपासणार असल्याचे जाहीर केले आहे. म्हणजे आधी बंदी, मग कारणांची शोधाशोध! हा चित्रपट जे दोन दिवस ‘ओटीटी’वर दिसला, तेव्हा तो हजारो प्रेक्षकांनी पाहून त्यावर समाजमाध्यमांवर लिहायला सुरुवात केली. त्यात समीक्षकही आहेत. काहींच्या मते, ही उत्तम कलाकृती असून, अभिनय, दिग्दर्शन, काळउभारणी, चित्रचौकटी, पार्श्वसंगीत अशा सर्वच बाबतीत तो सरस आहे. जसवंतसिंग खालरा यांचे काय झाले, याची गोष्ट तो सांगत असेल, तर त्यावर बंदी घालणे योग्य नाही. दुसरीकडे, काहींनी आशयाबाबत आणि चित्रपटकर्त्यांच्या हेतूंबाबत मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. चित्रपटातील मुख्यमंत्र्याच्या पात्राची (हे पात्र काँग्रेसचे तत्कालीन मुख्यमंत्री बेअंतसिंग यांच्यावर बेतले आहे.) हत्या दाखवताना, हत्या करणाऱ्याची भलामण करणारा वाटावा, असा हा प्रसंग आणि त्याचे पार्श्वसंगीत असल्याचा आरोप आहे. ज्या मानवतावादाची बाजू हा चित्रपट घेत असल्याचा दावा त्याचे कर्ते करतात, त्यांना हे कृत्य अमानुष का वाटू नये, असा सवाल त्यानिमित्ताने उपस्थित झाला. शिवाय १९८४ नंतर पंजाबमध्ये खलिस्तानवादी अतिरेक्यांची ज्या प्रकारची दहशत होती, त्या पार्श्वभूमीला चित्रपटाने टाळणे योग्य नाही, असाही सूर व्यक्त होतो. पंजाब विधानसभेची निवडणूक काही महिन्यांत असताना अकाली दल, काँग्रेस आणि ‘आप’ने चित्रपटावरील बंदी उठवण्याची मागणी केली आहे, तर माजी मुख्यमंत्री बेअंतसिंग यांचे सध्या भाजपमध्ये असलेले नातू रवनीतसिंग बिट्टू यांनी चित्रपटाबद्दल बोलताना, ‘पंजाबला पूर्ण सत्य सांगा, अर्धवट नको,’ असे म्हटले आहे.


‘पूर्ण सत्य’ असे काही एखाद्याच कलाकृतीत नसते. पण एखादा घटनाक्रम एखाद्या लेखक-दिग्दर्शकाला त्याच्या आकलनानुसार काढलेल्या अर्थान्वयानुसार दाखवावासा वाटला, तर त्यावर थेट बंदी का? अभिव्यक्तीला मोकळीक देऊन त्यावर खुली चर्चा होणे हे निरोगी समाजाचे लक्षण. चित्रपटातील म्हणणे एखाद्याला न पटल्यास त्यावर टीकेचा, प्रत्युत्तराचा हक्क असतोच. उदाहरणार्थ, ‘सतलज’ सत्याचा अपलाप करतो, असे कुणाला साधार म्हणावेसे वाटले, तर त्याबाबतही स्वीकारशील असायला हवे- अगदी चित्रपट तयार करणाऱ्यांनीही. पण ते सोडून मूळ कलाकृतीची मुस्कटदाबी हे त्यावर उत्तर असते का? असावे का? ‘या चित्रपटातील काही भागाचा भारतविरोधी शक्तींकडून अपप्रचारासाठी वापर केला जाऊ शकतो,’ अशी शंका हे बंदीचे म्हणे कारण. पण ‘सतलज’ आपल्याकडे ओटीटी मंचावरून काढला तरी तो इतर देशांत ‘झी फाइव्ह’वर दिसतोच आहे, त्याचे काय? शिवाय, या कथित ‘शक्तीं’नी जे काही दोन दिवस ‘सतलज’ भारतात दिसला, त्या वेळीच डाउनलोड करून ठेवला असेल, तर तो पसरवणे इतके अवघड आहे का? मुळात सर्व प्रकारच्या माहितीचे धबधबे अनेकानेक डिजिटल मंचांवरून रोज कोसळत असताना लोकांनी काय पाहावे, यावर खरेच नियंत्रण येऊ शकते का? एखादी घटना एखाद्या लेखक-दिग्दर्शकाला त्याच्या आकलनानुसार काढलेल्या अर्थान्वयानुसार दाखवावीशी वाटली, तर त्यावर थेट बंदी का? ‘केरळ स्टोरी’, ‘बंगाल फाइल्स’, ‘काश्मीर फाइल्स’ दाखवले जाऊ शकतात, तर ‘सतलज’ का नाही? सामान्यपणे पडणाऱ्या या सर्व प्रश्नांची नेमकी उत्तरे मिळत नाहीत, ही खरी रड आहे. घटिताकडे कुणी, कसे बघावे, याचीही मोकळीक न देणाऱ्या समाजात सत्याच्या जवळ जाण्यासाठी वाद-संवादापेक्षा सत्याच्या अपलापाची ओरड होते. दुर्दैवाने हेच ‘सतलज’चे सत्य आहे.

# पाऊले चालती पंढरीची वाट...

## पालखी प्रस्थान - पुणे ते सासवड

## बालाजी इंगोले पायी वारीतून (8530424041)

संतश्रेष्ठ ज्ञानराज माऊली पालखी सोहळा पुणे येथे भवानी पेठ येथे मुक्कामी विराजमान झाली. सकाळी 5.30 वाजता पंढरपूर कडे आज पुणे येथून मार्गस्थ झाली. दुसऱ्या मुक्कामासाठी पालखी सासवड येथे राहणार आहे. हा पुणे ते सासवड 38 किलोमीटरचा प्रवास पायी चालून पूर्ण करावयाचा आहे. पुण्याला माऊलीचा पालखी सोहळा एक आनंद उत्सव व सर्व पुणेकर साजरे करताना दिसले. छोट्या मोठ्या प्रत्येक घरातून वारकऱ्यांसाठी काहीतरी आपण खाऊ घालावे, शरबत पाजवावे, चहा पाजवावे, बिस्कीट द्यावं, शाबूची खिचडी, मसाला भगर, काहीतरी सेवा करावी हा सेवाभाव प्रत्येक पुणेकराच्या अंतकरणात दिसत होता. तो प्रत्येक वारकऱ्याला माऊली घ्या ना ,माऊली घ्या ना, अशी मनोभावे हाक मारून विनवणी करीत होता. त्यांचं प्रेम पाहून खरंच अंतकरण भारावून गेल. हा पृथ्वीवरील सोहळा एक अलौकिक दिव्य स्वप्न आहे. म्हणूनच सासवडच्या घाटाला दिव्य घाट असे नाव पडले असावे. दिवेघाटाचा सौंदर्य आजच्या दिवशीच काही आगळे वेगळे दिसून आलं. साधारण सकाळी साडेपाच पासून रात्री उशिरापर्यंत लाखोंचा वारकऱ्यांचा जनसमुदाय या दिव्य घाटातून मार्गक्रमण करणार आहे. वारी मध्ये असंख्य पखवाजाचा नाद व लाखों वारकऱ्याच्या गळ्यातील टाळ हा घुमत होता. हे मंगलमय वातावरण पाहण्याचे आम्हास या वारीच्या निमित्ताने आमच्या नशिबी लाभले.



अवघाची संसार सुखाचा करीन
आनंदे भरीन तिन्ही लोके
जाईन गे माये तया पंढरपुरा
भेटेल माहेर आपुलिया .

संसार हा लोभ, मोह, माया, अहंकार, काम, यामध्ये गुरफटलेला आहे त्यामुळेच संसार हा दुःखाचे मूळ आहे असे प्रत्येकाला वाटते. पण खरंच कुठेतरी माणसाने थांबले पाहिजे असं नाही वाटत का, तर निश्चितच थांबले पाहिजे. ज्या परमेश्वराने आपली माणूस म्हणून निर्मिती केली .वाईट काय ,चांगले काय, हे ओळखण्याची बुद्धी दिली. सुंदर असे श्रवण व ज्ञान इंद्रिय आपणास प्रदान केले. या सर्व ज्ञानेंद्रियांचा आपण माणूस म्हणून माणसाशी वागताना, जगताना कसा उपयोग करायला हवा हे पहिल्यांदा आचरणात आणणे गरजेचे वाटते. स्वतःच्या स्वार्थासाठी व मोहासाठी माणूस नको त्या गोष्टी करण्यासाठी पुढाकार घेऊन माणुसकी संपवण्यासाठी निघाला आहे. आपणास कोणी सुधारणार आहे किंवा आपण कोणामुळे चांगले होणार आहोत ही गोष्ट पहिल्यांदा डोक्यातून काढून टाका. कारण जोपर्यंत आपण स्वतःला आपण केलेल्या कार्याची ,कर्माची आपल्या अंतर्मनाला शहानिशा करून घेणार नाही सत्य ,असत्य त्याची पडताळणी करून घेणार नाही तोपर्यंत आपल्या डोळ्यावर धतराष्ट्राने बांधून घेतलेल्या डोळ्यावरच्या पट्टी सारखे काम होणार आहे आणि त्यामुळेच महाभारत घडले आपल्याही आयुष्यामध्ये संसारामध्ये महाभारत घडू नये असं वाटत असेल तर प्रत्येकानी कुठेतरी केव्हातरी या पायी वारीमध्ये सहभागी होऊन राम कृष्ण हरी, ज्ञानोबा माऊली तुकाराम चा जयघोष करत आपला अहंकार गाळून टाकून नामस्मरणामध्ये आपण तल्लीन होऊन संसाराची पायवाट सुखी करण्यासाठी हा साधा सरळ सोपा मंत्र निवडावा अशी विनंती करतो.

जात न पाहे देव, पाहे अंतरी भाव,
प्रेमामध्येच आहे, भक्तीचा ठाव
तुका म्हणे एकच जीव, सर्वां मध्ये वसे,
भेद मिटवू सारे, प्रेमची फुले फसे,

भक्ती करून पांडुरंगाच्या हृदयामध्ये स्थान मिळविण्यासाठी कोणत्याही कोणत्या विशिष्ट जातीत जन्म घेणे गरजेचे नाही कोणत्याही जातीमध्ये जन्म घेऊन पांडुरंगाकडे जाता येते पांडुरंगाची भक्ती करण्यासाठी पांडुरंगानी रिझर्वेशन ठेवलेलं नाही. म्हणूनच गोरा कुंभार, सावता माळी ,चोखा महार तुकाराम कुणबी, ज्ञानेश्वर ब्राह्मण, नामदेव शिंपी, संत सेना महाराज नाभिक समाजाचे, रंगनाथ महाराज वैश्य समाजाचे, सावता माळी, नरहरी सोनार, संत कान्होपात्रा तर वेश्या कुटुंबात जन्मलेली,

ही सर्व पांडुरंगाला प्रिय होती. नुसतीच प्रिय नव्हती तर त्यांच्यासाठी त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या दुःखात त्यांच्या कष्टात पारंपारिक पद्धतीने असलेली त्यांची कामे स्वतः पांडुरंगाने केलेली आहेत.

माणसाची किंमत त्याच्या जन्मावर नव्हे तर आचरणावर ठरते . समतेचा संदेश संत जगद्गुरु तुकाराम महाराज यांनी सातत्याने दिला आहे. तो सामान्य माणसांना नीट समजला नाही, समजू दिला नाही. व हे समजून सांगण्याचं काम आजपर्यंत प्रामाणिकपणे कोणी केलेलं नाही .त्यामुळेच आज समाजामध्ये असमानतेची दरी निर्माण झालेली आहे.

तेव्हा आपण जर या पायी वारीमध्ये सहभागी झालो तर वैष्णवाचा मेळा काय असतो, जात, पात काय असते. हे आपल्याला निश्चितच समजेल व आपल्या मनातील वाईट प्रवर्तिला गाडून टाकल्या शिवाय राहणार नाहीत.

यारे यारे लहानथोर ,याची भलते नारी नर .
करावा विचार, न लगेच चिंता कोणाची.

हा अभंग जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा आहे त्यांनी या अभंगातून भगवंताच्या भक्तीमध्ये लहान थोर स्त्री पुरुष असा कोणताही भेद नसतो. कोणत्याही जाती पातीचे लोक येथे येऊन नामस्मरण करू शकतात आणि मुक्तीचा आनंद घेऊ शकतात. व परमेश्वरास आपलेसे करू शकतात.

असा संदेश असे भावपूर्ण अभंग त्यांनी समाज हिताचे आपणास दिलेले आहेत तेव्हा संतांनी घालून दिलेले शिकवणीवर आपण चालून समाज, राष्ट्र ,नाते , शेजार धर्म, बंधुप्रेम, बहिणीचे प्रेम, आई-वडिलांचे प्रेम, समाजाचे प्रेम, कसे चांगले राहतील याकडे लक्ष द्यावे हीच माझ्या सर्व वाचकांना माझी नम्र विनंती.

क्रमशः.. पुढील भाग




**संत श्रेष्ठ ज्ञानोबा माऊली च्या पालखी रथासोबत सर्वप्रथम आळंदीचा मानाचा बँड, मानाचा नगारा, माऊलीचा घोडा, चोपदाराचा घोडा, माऊलीची पालखी असा सोहळा असतो. नगारा मानकरी प्रमुख श्री भाऊ भोसले यांची भेट झाली व त्याने सांगितले की पिढ्यानपिढ्यापासून आम्ही हा सोहळा आनंदाने पूर्ण करण्यासाठी काम करीत असतो.**

**यामध्ये माझ्या विचाराशी आपण सहमत असावे असे माझे मत नाही. जे चांगलं आहे ते आपण स्वीकारावं . आपण सर्व मिळून समाजाला उन्नति कडे घेऊन जाण्यासाठी माणूस म्हणून आपण सदैव प्रयत्न करून संत विचारांमध्ये व शिकविणेमध्ये जगण्याचा प्रयत्न करू हीच मनुष्य प्रार्थना.**



# पिक विम्यातील आरोपी अखेर पोलिसांच्या जाळ्यात

## माहूर न्यायालयाने सुनावली दोन दिवसांची पोलीस कोठडी

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**वाई (बाजार) :-** पिक विमा अपहार प्रकरणामध्ये जामीन मिळवण्यात असफल झाल्यानंतर स्वतःहून पोलिसांना शरण गेलेल्या आरोपीस माहूर न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याने दडलेले आरोपी व अधिक सत्य बाहेर येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. वाई (बाजार) येथील पिक विमा अपहार प्रकरण शिक्षेच्या अंतिम टप्प्याकडे जाताना दिसत आहे. माहूर तालुक्यातील बहुचर्चित पिक विमा अपहार प्रकरणांमध्ये अनेक घडामोडी झाल्या. जिल्हा सत्र न्यायालयाने जामीन फेटाळल्यानंतर आरोपी साजिद मजीद खान व मोईन मजीद खान यांनी औरंगाबाद येथील उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाकडे जामीन अर्ज केला होता. त्यापैकी मोईन मजीद खान यांचा अपहार प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष सहभाग नसल्याचे निरीक्षण नोंदवून न्यायालयाने त्यास १५ हजाराच्या जात मुचलक्यावर जामीन दिला.परंतु जामीन देत असताना काही ताकीद निकालात नमूद केल्या त्यामुळे आरोपीस दिलासा नसून पाय अजूनही खोलात असल्याचे दिसून येते. आरोपींनी जामीनासाठी दाखल केलेली याचिका स्वतःहून मागे घेतल्यामुळे दि.१० जुलै रोजी प्रकरण निकाली निघाले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सिंदखेड पोलिसांनी जामीन न मिळालेल्या साजिद खान यास अटक करून माहूर न्यायालया पुढे हजर केले असता त्यास दोन दिवसाची पोलीस कोठडी मिळाली. आरोपीस मिळालेल्या पोलीस कोठडीमुळे या गैरकृत्यामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग असणारे व्यक्ती आरोपी म्हणून पुढे येणार असल्याची शक्यता बळावली आहे. कायदे अभ्यासकांच्या मते पुढे न्यायालयीन कोठडी पासून शिक्षेपर्यंतचा प्रवास अद्याप बाकी आहे. गैर मार्गाचा अवलंब करून ईतरांची फसवणूक करणाऱ्यास काही केल्या दिलासा मिळणार नाही हे न्यायालयीन प्रक्रियेतून सिद्ध झाले आहे. शिक्षेची टांगती तलवार त्यांच्या मस्तकावर कायम राहणार आहे.

# आज रंगणार कै.सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्काराचा भव्य सोहळा

## खा. अशोकराव चव्हाण, खा. ॲड. उज्वल निकम यांची प्रमुख उपस्थिती; विजयाताई रहाटकर, राजेंद्र दर्डा यांच्यासह पाच जणांचा होणार सन्मान

श्रमिक लोकराज्य नेटवर्क

**नांदेड :** मराठवाड्यासह महाराष्ट्रातील प्रतिष्ठेच्या प्रमुख पुरस्कारांपैकी एक असलेल्या कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार सोहळ्याचे भव्य आयोजन उद्या दि. १२ जुलै रोजी करण्यात आले आहे. याच कार्यक्रमात या वर्षीपासून सुरू करण्यात आलेला डॉ. शंकरराव चव्हाण जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

दि. १२ जुलै रोजी स्टेडियम परिसरातील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात होणाऱ्या या भव्य व दिमाखदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण तर, प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ खा. उज्ज्वल निकम राहणार आहेत. आ. श्रीजया चव्हाण व उद्योजिका सुजया चव्हाण यांची उपस्थिती असेल.

या समारंभात राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजयाताई रहाटकर यांना कै. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या वर्षी पहिल्यांदाच डॉ. शंकरराव चव्हाण जीवनगौरव पुरस्काराची सुरुवात करण्यात आली असून लोकमतचे एडिटर इन चीफ तथा राज्याचे माजी मंत्री राजेंद्र दर्डा यांना हा पहिला पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



**या सोबतच छत्रपती संभाजीनगर येथील स्नेहसावली या सामाजिक संस्थेचे संस्थापक डॉ. बालाजी आसेगावकर, विमान क्षेत्रात गगनभरारी घेतलेले मराठमोळे व्यावसायिक मॅब एव्हिएशनचे संस्थापक मंदार भारदे व महिला बुद्धिबळ विश्वविजेती दिव्या देशमुख यांना देखील कै. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. नांदेडच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या या पुरस्कार सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक संतोष पांडागळे, अभिजित देशमुख, बालाजी जाधव, संदीप पाटील. सीए. मनोहर आयलाने, राजेश शिंदे यांनी केले आहे.**

# गावविकासासाठी झटणारे लोकाभिमुख युवा नेतृत्व

# बालाजी पाटील खतगावकर यांचे खंदे समर्थक

## कार्यतत्पर, सेवाभावी व विकासाभिमुख व्यक्तिमत्व

# मा. सरपंच श्रीकांत काळे

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..! १२ जुलै

**गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने झटणारे, सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात धावून जाणारे, शेतकरी, युवक आणि गोरगरीब जनतेच्या प्रश्नांसाठी नेहमी संघर्ष करणारे बेनाळ (ता. मुखेड) येथील माजी सरपंच श्रीकांत काशिनाथ काळे हे आज मुखेड तालुक्यासह परिसरात एक कर्तृत्ववान, लोकाभिमुख आणि सेवाभावी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. दि. १२ जुलै २०२६ रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्या कार्याचा आढावा घेणे निश्चितच प्रेरणादायी ठरते. सर्वप्रथम श्रीकांत काळे यांना वाढदिवसाच्या कोटी-कोटी हार्दिक शुभेच्छा!**




बेनाळ गावचे माजी सरपंच म्हणून काम करताना त्यांनी गावाच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले. गावातील रस्ते, वीजपुरवठा, सार्वजनिक



प्रकाश व्यवस्था, पिण्याचे पाणी, सभागृह, समाजमंदिर, सार्वजनिक सुविधा आणि मूलभूत विकासकामांसाठी त्यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला. अनेक वेळा शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवत गावाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले.



गावातील कोणत्याही नागरिकाचे अडलेले काम असो किंवा शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचा प्रश्न असो, श्रीकांत काळे हे नेहमी सर्वसामान्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. तहसील कार्यालय, पंचायत समिती, जिल्हाधिकारी कार्यालय किंवा इतर शासकीय विभागांमध्ये नागरिकांची कामे मार्गी लावण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यामुळे आजही गावकऱ्यांच्या मनात त्यांच्याबद्दल विश्वास आणि आपुलकीची भावना आहे.

शेतकरी हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू राहिला आहे. पीकविमा, बोगस बियाणे, पिकांच्या नुकसानीची भरपाई, कृषीविषयक समस्या अशा अनेक प्रश्नांवर त्यांनी आंदोलने, निवेदने आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी त्यांनी वेळोवेळी प्रशासनाला धारेवर धरले. त्यामुळे शेतकरी वर्गात त्यांच्याबद्दल विशेष आदराची भावना आहे.

बेनाळ गावात अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पुलाच्या प्रश्नासाठीही त्यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला. गावाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या या महत्त्वाच्या कामाला मंजुरी मिळवून देण्यासाठी त्यांनी घेतलेले प्रयत्न त्यांच्या विकासाभिमुख दृष्टीकोनाची साक्ष देतात.



कोरोना महामारीच्या कठीण काळात संपूर्ण समाज संकटात असताना श्रीकांत काळे यांनी घरात न थांबता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून जनसेवा केली. अनेक गरजू कुटुंबांना अन्नधान्य किटचे वितरण करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. शेकडो कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंची मदत करून संकटाच्या काळात माणुसकीचे दर्शन घडविले. तसेच लेंडी प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रश्नांसाठीही त्यांनी सातत्याने सहकार्य केले आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आवाज उठविला.



सामाजिक आणि धार्मिक कार्यातही त्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे. अन्नदान, धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम किंवा जनहिताचे कोणतेही कार्य असो, ते नेहमी अग्रस्थानी राहिले आहेत. समाजामध्ये धार्मिक आणि सामाजिक सलोखा कायम राहावा यासाठी त्यांनी अनेक विधायक उपक्रम राबविले. त्यांच्या पुढाकारातून महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले, ज्यामुळे परिसरातील नागरिकांना अध्यात्म आणि समाजप्रबोधनाचा लाभ मिळाला.

राजकीय क्षेत्रातही श्रीकांत काळे यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे देगलूर तालुकाध्यक्ष म्हणून त्यांनी पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी उल्लेखनीय काम केले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच जिल्हाध्यक्ष मॉन्टीसिंह जहागीरदार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी जनसेवेचा वसा स्वीकारला आहे.



**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी तथा एमएसआरडीसीचे महाव्यवस्थापक बालाजी पाटील खतगावकर यांचे खंदे समर्थक असून, मागील विधानसभा निवडणुकीतही त्यांनी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने कार्य केले. सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या विविध उपक्रमांमध्ये ते कायम सक्रिय राहिले असून युवकांना समाजकारणासाठी प्रेरित करण्याचे कार्यही त्यांनी केले आहे.**

**सर्वधर्मसमभाव, सामाजिक समता आणि बंधुभाव ही मूल्ये जपत गावात सौहार्दाचे वातावरण कायम राहावे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन विकासाची वाटचाल करण्यावर त्यांचा नेहमी भर राहिला आहे. त्यामुळे राजकीय कार्यकर्त्याबरोबरच एक संवेदनशील समाजसेवक, अभ्यासू नेतृत्व आणि जनतेचा विश्वासू प्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ झाली आहे. अशा या कार्यतत्पर, सेवाभावी, अभ्यासू आणि विकासाभिमुख व्यक्तिमत्त्वाला वाढदिवसानिमित्त पुन्हा एकदा कोटी-कोटी शुभेच्छा. त्यांना निरोगी, दीर्घायुषी आणि यशस्वी आयुष्य लाभो तसेच त्यांच्या हातून भविष्यातही गाव, तालुका आणि समाजाच्या विकासासाठी अशीच उल्लेखनीय जनसेवा घडत राहो, हीच सदिच्छा.**

हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व **संपादक डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **गजानन केशवराव काळे** यांच्या **तेजस्विनी ऑफसेट प्रिंटर्स प्लॉट नं. डी-४१, साई स्मरण ऑइल इंडस्ट्रीज समोर, आर.टी.ओ. रोड, एमआयडीसी नांदेड - 431604** येथे प्रकाशित केले. E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

**Daily Shramik Lokrajya**, Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO,** Printer **GAJANAN KESHAVRAO KALE.** Printed at **TEJASWINI OFFSET PRINTERSPlot No. D-41, Opp. Sai Smaran Oil Industries R.T.O Road, MIDC Nanded, (Maharashtra) - 431604 M.S.** & Published Near AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715
Email: shramiklokrajya@gmail.com

# वाघी–कामारी नाल्यावरील पुलाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्न

## व्हायरल व्हिडिओनंतर चौकशीची मागणी

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**हिमायतनगर :** नांदेड जिल्ह्यातील विष्णुपुरी येथील राष्ट्रीय महामार्गावरील पुलाचा भराव ढासळल्याची घटना ताजी असतानाच हिमायतनगर तालुक्यातील वाघी–कामारी नाल्यावरील नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुलाच्या कॉलममधील काँक्रीट दगडाने आणि हाताने सहज निघत असल्याचा दावा करणारा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नुकतेच पूर्ण झालेल्या पुलाच्या खांबावरील काँक्रीट सहज तुटत असल्याने बांधकामाच्या दर्जाबाबत शंका निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत या पुलावरून एखादे अवजड वाहन गेल्यास मोठी दुर्घटना होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या कामात संबंधित अभियंते आणि ठेकेदार यांची कथित संगनमत असल्याचा आरोपही काही नागरिकांनी केला आहे. सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेल्या या पुलाच्या कामाकडे संबंधित बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप होत असून, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

**व्हायरल झालेल्या व्हिडिओची तसेच पुलाच्या गुणवत्तेची स्वतंत्र तांत्रिक (Quality Audit) तपासणी करून बांधकामाची मजबुती तपासावी, अशी मागणी जोर धरत आहे. तपासणीत अनियमितता किंवा निकृष्ट दर्जाचे काम आढळल्यास संबंधित ठेकेदार, कामाची देखरेख करणारे अभियंते आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दरम्यान, भविष्यात या पुलामुळे कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित ठेकेदार आणि देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात यावी, अशीही मागणी पुढे येत आहे.**

# ग्रामपंचायतीची वाट न पाहता जाहूरच्या तरुणांनी हाती घेतली गाव स्वच्छतेची धुरा






**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**जाहूर :** मुखेड तालुक्यातील जाहूर येथे गाव स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्याच्या उद्देशाने गावातील युवकांनी स्वयंस्फूर्तीने दर रविवारी 'गावासाठी एक दिवस' या संकल्पनेतून स्वच्छता अभियान सुरू केले आहे. ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन राबविण्याची अपेक्षा असलेले हे काम युवकांनी स्वतःच्या जबाबदारीतून हाती घेतल्याने गावभर या उपक्रमाचे कौतुक होत आहे.
स्वच्छता अभियानाची सुरुवात ग्रामपंचायत कार्यालय परिसरापासून करण्यात आली. युवकांनी हातात झाडू घेऊन कार्यालय परिसर, सार्वजनिक ठिकाणे व रस्त्यांची साफसफाई केली. सलग तिसऱ्या रविवारी उत्साहात श्रमदान करून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.
गाव स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी केवळ ग्रामपंचायतीची नसून प्रत्येक ग्रामस्थाची आहे, हा संदेश युवकांनी आपल्या कृतीतून दिला आहे. गावातील स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण व्हावी आणि प्रत्येक नागरिकाने यात सहभाग घ्यावा, या उद्देशाने दर रविवारी श्रमदान करण्यात येत आहे.
जाहूरमधील युवकांचा हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरत असून, लोकसहभागातूनच स्वच्छ व सुंदर गावाची संकल्पना प्रत्यक्षात उतरू शकते, हे या अभियानातून अधोरेखित होत आहे. ग्रामस्थांनी युवकांच्या या सामाजिक उपक्रमाचे स्वागत करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

# नगरपालिकेच्या बघ्याच्या भूमिकेमुळे देगलूर शहरात अवैध अतिक्रमणांचे साम्राज्य; नागरिक त्रस्त

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**देगलूर :** देगलूर शहरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या अवैध अतिक्रमणांमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. मुख्य रस्ते, चौक, पदपथ आणि बाजारपेठ परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाल्याने वाहतुकीची कोंडी, अपघातांचा धोका आणि पादचाऱ्यांची गैरसोय वाढली आहे. मात्र या गंभीर समस्येकडे नगरपालिकेने बघ्याची भूमिका घेतल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.
शहरातील अनेक ठिकाणी दुकानदारांनी रस्त्यावरच साहित्य मांडल्याने वाहनचालकांना कसरत करत मार्ग काढावा लागत आहे. पदपथ अतिक्रमणाखाली गेल्यामुळे पादचाऱ्यांना थेट रस्त्यावरून चालावे लागत असून, त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. शाळकरी विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

**देगलूर शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांच्या तीव्र आंदोलनाला सामोरे जावे लागेल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.**

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा तक्रारी करूनही नगरपालिकेकडून केवळ औपचारिक कारवाई केली जाते. काही दिवसांत पुन्हा अतिक्रमणे पूर्ववत होत असल्याने प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
विशेष म्हणजे, शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याची जबाबदारी असलेल्या संबंधित यंत्रणांनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. वाढत्या अतिक्रमणामुळे आपत्कालीन सेवा, रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलालाही अडथळ्यांचा सामना करावा लागू शकतो, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

# पावसाने फिरवली पाठ; हिमायतनगरात खरीप धोक्यात, कृषी विभागाच्या भूमिकेवरही शेतकऱ्यांचा संताप

## उगवलेली पिके करपू लागली; बोगस बियाण्यांच्या संशयाने शेतकरी हवालदिल

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**हिमायतनगर, :** हिमायतनगर तालुक्यात पावसाने अचानक दडी मारल्याने खरीप हंगाम संकटात सापडला असून, उगवलेली पिके करपू लागल्याने शेतकरी हतबल झाला आहे. गेल्या सात ते आठ दिवसांपासून समाधानकारक पाऊस नसल्यामुळे सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कापूस आणि हळद पिकांवर मोठे संकट ओढवले आहे. वेळेत पाऊस झाला नाही तर हजारो शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे आर्थिक संकट कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे.
मान्सूनच्या सुरुवातीला अनुकूल वातावरण निर्माण झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरणी केली. मात्र दोन-तीन दिवसांच्या हलक्या सरींनंतर पावसाने पाठ फिरवली. परिणामी जमिनीतील ओलावा संपत चालला असून, अनेक शेतांमध्ये उगवलेली रोपे करपू लागली आहेत. हलक्या जमिनीवरील पिकांची अवस्था सर्वाधिक गंभीर आहे. ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण असून, अनेक ठिकाणी शेतकरी पावसासाठी देवळांत पंगती घालत आहेत. लहान मुले "धोंडी धोंडी पाणी दे... साई माई पिकू दे..." अशी पारंपरिक हाक देत पावसासाठी प्रार्थना करत असल्याचे भावनिक चित्र पाहायला मिळत आहे.




कृषी विभागावरही शेतकऱ्यांचा रोष यंदाच्या खरीप हंगामापूर्वी तालुका कृषी विभागाने व्यापक पेरणीपूर्व मार्गदर्शन न केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. काही निवडक शेतकऱ्यांसोबत कार्यक्रम करून केवळ औपचारिकता पूर्ण करण्यात आली, मात्र सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत आवश्यक मार्गदर्शन पोहोचले नाही, अशी भावना व्यक्त होत आहे. त्यातच अनेक शेतकऱ्यांनी महागडे बियाणे खरेदी करूनही उगवण न झाल्याची तक्रार केली आहे. त्यामुळे बोगस बियाण्यांचा पुरवठा झाला का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. बियाण्यांचे नमुने घेतले; अहवाल मात्र अद्याप गुलदस्त्यात
शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कृषी विभागाने हिमायतनगर शहरातील बियाणे विक्रेत्यांकडून नमुने तपासणीसाठी घेतले. मात्र अद्याप तपासणी अहवाल जाहीर करण्यात आलेला नाही. दरम्यान, अनेक शेतकऱ्यांना पहिल्याच पावसावर पेरणी करावी लागली. आता बियाण्यांची उगवण न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आणि संताप वाढला आहे. काही शेतकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप केला आहे.

**खरीप हंगामातील नियोजन, पेरणीपूर्व मार्गदर्शन, बियाण्यांची गुणवत्ता आणि शेतकऱ्यांच्या तक्रारी हाताळण्यात हिमायतनगर तालुका कृषी अधिकारी यांच्याकडून झालेल्या कथित हलगर्जीपणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. या बाबत तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.**

# नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ.निलभ रोहन यांचा धर्माबाद पोलीस ठाण्याला पहिला दौरा

## वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**धर्माबाद :** नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ.निलभ रोहन यांनी आज प्रथमच धर्माबाद पोलीस ठाण्याला अधिकृत भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते पोलीस ठाणे परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत त्यांनी अधिकाधिक वृक्ष लागवड व त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन केले.
या प्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील , पोलीस निरीक्षक सदाशिव भडिकर ,सहाय्यक पोलीस निरीक्षक ,पोलीस उपनिरीक्षक तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व अधिकाऱ्यांनीही वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाची सामूहिक शपथ घेतली.

# गोकुंदा येथील महात्मा फुले विद्यालयात एनसीसी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

## विद्यार्थ्यांना देशसेवेची प्रेरणा

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**किनवट, :** महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गोकुंदा(ता. किनवट) येथे एनसीसी अधिकाऱ्यांच्या सदिच्छा भेटीचा व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचा कार्यक्रम उत्साहात नुकताच (ता.08) पार पडला. एनसीसीचे महत्त्व, शिस्त, नेतृत्वगुण, देशसेवा तसेच करिअरच्या विविध संधींबाबत विद्यार्थ्यांना यावेळी प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले.
संस्थेचे सचिव अभियंता प्रशांत ठमके तसेच संस्थेच्या कोषाध्यक्षा व प्राचार्या शुभांगी ठमके यांच्या पुढाकारातून ८ जुलै रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमास एनसीसी ग्रुप मुख्यालय, छत्रपती संभाजीनगरचे ग्रुप कमांडर तसेच ५२ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, नांदेडचे कमांडिंग ऑफिसर कर्नल के. दिलीप रेड्डी यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. एनसीसीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वक्षमता, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची भावना विकसित होत असल्याचे त्यांनी सांगितले.
यावेळी शिक्षणतज्ज्ञ किशोरी पाठक यांनीही विद्यार्थ्यांना शिक्षणातील सातत्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि जीवनमूल्यांचे महत्त्व पटवून देत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेकंड ऑफिसर ज्ञानेश्वर कदम यांनी केले, तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक प्रा. संतोष ठाकूर यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व पालकांची उपस्थिती होती. उपस्थितांनी मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

## गावात घुसलेल्या रानडुक्कराचा धुमाकूळ

# घरांची नासधूस, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**जाहूर -** मुखेड तालुक्यातील उंद्री (प.दे) येथे शनिवारी ११ जुले दुपारच्या सुमारास गावात घुसलेल्या रानडुक्कराने चांगलाच धुमाकूळ घातला.अचानक गावात रानडुक्कर आल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून काही काळ नागरिकांची एकच धावपळ उडाली.
गावात घुसलेल्या रानडुक्कराने काही घरांमध्ये शिरून घरातील साहित्याची नासधूस केली.तसेच काही ठिकाणचे टिनपत्रे पाडून नुकसान केले, तर कंपाउंड्या जाळ्याही फोडल्या. या प्रकारामुळे संबंधित कुटुंबांचे आर्थिक नुकसान झाले असून ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.
ग्रामस्थांच्या माहितीनुसार, परिसरातील पाण्याच्या टंचाईमुळे रानडुक्कर पाण्याच्या शोधात गावाकडे वळल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वन्यप्राण्यांचा गावाकडे वाढता वावर नागरिकांसाठी धोकादायक ठरत असल्याने लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या घटनेची वन विभागाने तातडीने दखल घेऊन रानडुक्करांचा बंदोबस्त करावा, तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# पुण्यात पूरानंतर स्वच्छता मोहीम; उपमहापौरांनी केली पाहणी



**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**पुणे :** मुसळधार पावसानंतर शहरात नदीला आलेल्या पुरामुळे बोपोडी स्मशानभूमी, मुस्लिम कब्रस्तान, आदर्श नगर, हरीश ब्रिज सबवे आदी परिसरात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.
यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने गाळ काढून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्याचे आदेश देण्यात आले. जेट मशीनसह विविध आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून दिवसभरात स्वच्छता मोहीम राबवून परिसर पूर्ववत करण्यात आला. पूराच्या काळात तसेच पाणी ओसरल्यानंतरही प्रशासनाला सतर्क ठेवून नागरिकांच्या स्वच्छता, सुरक्षितता आणि मूलभूत सुविधांसाठी आवश्यक कामे तातडीने पूर्ण करण्यात आल्याची माहिती उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी दिली.